जा.क्र.प्राफसंके/आंबा/गांडूळखत/ 1326 /२०२१
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला
दि. 05 JUL 2021

प्रति,

..........................

..........................

..........................

**विषय:** आंबा प्रक्षेत्रावर प्रायोगिक तसेच गांडूळखत निर्मितीची अनुषंगिक कामे करून देण्यासाठी प्रतिदिवस मजूरीचे दरपत्रक देणेबाबत............

महाशय,

प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले येथील आंबा प्रक्षेत्रावर गांडूळखत निर्मिती तसेच प्रक्षेत्रावर किडनियंत्रणाची निरीक्षणे घेणे व त्या अनुषंगिक इतर कामे करावयाची आहेत. त्यासाठी सदर कामाची माहिती असलेल्या इच्छूक व्यतींकडून प्रति दिवस मजूरीचे दर मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूक व्यक्तींनी आपले दरपत्रक दिनांक १९/७/२०२१ रोंजी किंवा त्यापूर्वी या कार्यालयास निम्नस्वाक्षरीकार यांच्या नावे सादर करावे.

सर्वसाधारण अटी व शर्ती:—

१. प्रस्तावित कामे संबंधित विभागप्रमुख यांच्या सल्ल्याने आवश्यकतेनुसार करण्यात यावीत.
२. कामाच्या देयकाची अदायगी महिना पूर्ण झाल्यावर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करतेवेळी विभागप्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचा काम वेळेत पूर्ण केल्याबाबतचा दाखला जोडणे आवश्यक आहे.
३. निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.
४. ठेकेदार व्यक्तीकडे स्वत:चे पॅनकार्ड व बॅंकखाते असणे आवश्यक आहे.
५. प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे नुकसान झाल्यास योग्यती वसुली करण्यात येईल.
६. काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.
७. ठेकेदार व्यक्तीस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.
८. ठेक्यासंबंधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख/ विद्यापीठ प्रशासनास राहतील.
९. ठेक्यातील मजूरांची किमान व कमाल वयोमर्यादा शासननिर्णयानुसार निश्चित केलेली असावी.
१०. याचिका क्र. १५१९१/२०१८ संदर्भात मा. उच्चन्यायालय, मुंबई यांच्या दिनांक १८ एप्रिल, २०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीस अनुसरून परिच्छेद क्र. ५१ (ई) नुसार याचिकाकर्त्या मजूरांना ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवश्यक आहे.

सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक फळ संशोधन, वेंगुर्ले

PC-3/D-drive/Dor correspondence/Letter M